अधिकारी घडविणारी विश्वसनीय संस्था

# स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

UPSC /MPSC /BANKING / SSC

Director : Dr. Vilas S. Gajghate 9923262977

प्रश्नप्रत्रिका क्रमांक
**BOOKLET NO.** 202304

**2023**

**Code : SP04**

## संयुक्त पूर्व परीक्षा (गट ब व गट क)

## सामान्य क्षमता चाचणी

वेळ : 1 (एक) तास

Paper No. 4

एकूण प्रश्न : 100

एकूण गुण : 100

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा क्रमांक ह्या चौकोनात न विसरता बॉलपेनने लिहावा.

| परीक्षा - क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नप्रत्रिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईनेचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(क) मराठी व इंग्रजी आकलनावरील प्रश्न अनुक्रमे फक्त मराठी व फक्त इंग्रजी भाषेत असतील.

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणारा नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे. पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नूमद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) (अ) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत".**

(ब) "Decision Making & Problem Solving" वरील प्रश्नांच्या चुकीच्या उत्तरांसाठी गुण वजा केले जाणार नाहीत. **प्रस्तुत प्रश्न वगळून प्रश्नपत्रिकेतील उर्वरित प्रश्नांकरिता उमेदवारांनी सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील.**

### ताकीद (नमूना)

ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणतयाही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिध्द करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम - ८२" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/ किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल. तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुध्दा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुध्द उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा.**

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK.

# परीक्षार्थींचे स्व-आकलन

## ✦ संयुक्त पूर्व परीक्षा (गट ब व गट क) ✦

| अ.क्र. | विषयाचे नाव | एकूण प्रश्न | मी सोडवलेले प्रश्न | बरोबर | चुक | कोणत्या घटकावर चुकले | चुकलेल्या घटकासाठी अभ्यासाचे केलेले नियोजन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | राज्यव्यवस्था | | | | | | |
| 2. | अर्थव्यवस्था | | | | | | |
| 3. | इतिहास | | | | | | |
| 4. | भुगोल | | | | | | |
| 5. | सा. विज्ञान | | | | | | |
| 6. | गणित व बुध्दीमत्ता | | | | | | |
| 7. | चालू घडामोडी | | | | | | |

📖 ✍ मी अशी खात्री देतो की चुकलेल्या घटकावरती अभ्यास करुन भविष्यात त्या चुका टाळेल.

**कच्च्या कामासाठी जागा / Space For Rough Work.**

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

1 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) 'पद्म पुरस्कार – 2023' हा एकूण 106 व्यक्तींना प्रदान करण्यात आले आहे.

(ब) 'झाकीर हुसेन' यांना कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सन 2023 या पद्मविभूषण पुरस्कार प्राप्त झाला आहे.

(क) 'पद्म पुरस्कार – 2023' चा एकूण 23 महिलांना प्राप्त झाला.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त (अ) आणि (क) विधाने योग्य आहेत.
2) फक्त (अ) आणि (ब) विधाने योग्य आहेत.
3) फक्त (ब) विधान योग्य आहे.
4) फक्त (क) विधान योग्य आहे.

2 **'मिस युनिव्हर्स – 2022' या पुरस्काराबाबत योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) 'मिस युनिव्हर्स – 2022' ची स्पर्धा 'बर्लिन' शहरात आयोजित केली होती.

(ब) 'मिस युनिव्हर्स – 2022' च्या स्पर्धेची विजेती महिला 'आर.बोनी गॅब्रिएल' ठरली आहे.

(क) 'मिस युनिव्हर्स – 2022' ची ही 69 वी स्पर्धा होती.

(ड) 'भारताची दिविता राय' हीने मिसयुनिव्हर्स 2022' च्या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त (ब) आणि (ड) विधाने योग्य आहेत
2) फक्त (अ), (ब) आणि (क) विधाने योग्य आहेत.
3) फक्त (ब), (क), (ड) विधाने योग्य आहेत
4) फक्त (क) आणि (ब), विधाने योग्य आहेत

3 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) 26 जानेवारी 2023 रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून राज्याच्या वन्यजीव आणि धार्मिक स्थळाचे प्रदर्शन करणाऱ्या उत्तराखंडच्या चित्ररथाला प्रथम परितोषिक प्राप्त झाले आहे.

**(ब) आझादी के अमृत महोत्सवात महाराष्ट्राच्या चित्ररथाने झाडे तीन शक्तीपीठे आणि नारी शक्ती सादर केले आहे.**

**(क) महाराष्ट्र राज्याच्या चित्ररथाला** 2023 **च्या प्रजासत्ताक दिनी तृतीय पारितोषिक प्राप्त झाले आहे.**

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त (ब) आणि (क) विधाने योग्य आहेत.
2) फक्त (ब) विधान योग्य आहे.
3) फक्त (क) विधान योग्य आहे.
4) फक्त (अ) आणि (ब) विधाने योग्य आहेत.

4 **'बंधन बॅंके' बाबत योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) बंधन बॅंकेने बॅंकेचे ब्रॅंड अॅम्बेसेंडर म्हणून मिताली राज' यांच्या सोबत 'जहॉं बंधन, वहन ट्रूस्ट मोहीन' सुरू केली आहे.

(ब) 'जहॉं बंधन, वहन ट्रूस्ट मोहीम' ची संकल्पना 'केओ बर्नेट ऑर्चड' यांनी केली होती.

(क) बंधन बॅंक लिमिटेड ही फक्त वित्तीय सेवा कंपनी आहे.

(ड) बंधन बॅंकेचे मुख्यालय नवी दिल्ली येथे असून 23 ऑगस्ट 2015 रोजी पासून बंधन बॅंकेने कामकाजाला सुरूवात केली आह.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त (अ), (ब) आणि (क) विधाने योग्य आहेत.
2) फक्त (ब) आणि (ड) विधाने योग्य आहेत.
3) फक्त (ब) विधान योग्य आहे
4) फक्त (ब) आणि (क) विधाने योग्य आहेत.

5 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच संपूर्ण सरकारी मालकीच्या ऊर्जा कंपनी SJVN च्या 500 MV बिकानेर सौर ऊर्जा प्रकल्पाची पायाभरणी केली आहे.

(ब) 'बिकानेर सौर ऊर्जा प्रकल्प' हा आगामी 2025 पर्यत कार्यान्वित करण्याचे भारत सरकारचे धोरण आहे.

(क) 'बिकानेर सौर ऊर्जा प्रकल्पामुळे' भारताला सन 2030 पर्यत 500 GW चे अक्षय्य उद्दिष्ट साध्य करण्यात मदत होईल.

(ड) 'बिकानेर सौर ऊर्जा प्रकल्पामुळे' 40, 47, 885 टन कार्बन उत्सर्जनातही घट होणार आहे.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त (ब), (क)आणि (ड) विधाने योग्य आहेत.
2) फक्त (क) विधान योग्य आहे
3) फक्त (अ) (ब) आणि (क) विधाने योग्य आहेत.
4) फक्त (ब) आणि (ड) विधाने योग्य आहेत.



स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

6 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) द्विवार्षीक एअर शो आणि एव्हिएशन एक्स्पो, एरो इंडिया – 2023 ची स्थर्धा 'बेंगळुरू मधील येलाहंका एअर फोर्स वर आयोजित केली जाणार आहे.

(ब) एरो इंडिया इव्हेंटचे उद्दिष्ट विमान वाहतुक क्षेत्रातील ज्ञान संकल्पना आणि नवकल्पनांची देवाण घेवाण करण्यासाठी विशेष संधी प्रदान करणे आहे.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त (अ) विधान योग्य आहे.
2) फक्त (ब) विधान योग्य आहे.
3) विधाने (अ) आणि (ब) अयोग्य आहेत.
4) विधाने (अ) आणि (ब) योग्य आहेत.

7 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) वासेनार अरेजमेंट व्यवस्था ही एक बहुपक्षीय आयात नियंत्रण व्यवस्था आहे.

(ब) वासेनार अरेजमेंट (WA) व्यवस्थेच्या 2023 चे अध्यक्ष पद सध्या भारताकडे आहे.

(क) भारत सन 2017 मध्ये वासेनार अरेंजमेंट (WA) व्यवस्थेमध्ये 42 वे सहभागी राज्य म्हणून सामील झालेला देश आहे.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त विधाने (अ) आणि (क) योग्य आहेत.
2) फक्त (ब) आणि (क) विधाने योग्य आहेत.
3) फक्त (ब) विधान योग्य आहे.
4) फक्त (अ) विधान योग्य आहे.

8 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) भारतातील 'इंडियन इंन्स्टिट्युट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च (IISER ) पुणे येथीली संशोधकांनी व्हायोलोजन – युनिट ग्राप्डेड ऑर्गेनिक-फ्रेमवर्क नावाची नवीन सामग्री विकसित केली आहे.

(ब) 'व्हायोलोजन युनिट ग्राफ्टेड ऑर्गेनिक – फ्रेमवर्क' च्या माध्यमातून खाऱ्या पाण्यातील दुषित घटक बाहेर काढले जातात.

(क) सॉर्बेट सामुग्रीचा वापर आयन-विनिमय प्रक्रियेद्वारे प्रदूषकांना अडकवून पाणी शुद्ध केला जातो, परंतू ही सामग्री गतिमान आणि वेगवान नाही.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त (अ) आणि (क) विधाने योग्य आहेत
2) फक्त (ब) आणि (क) विधाने योग्य आहेत
3) फक्त (अ) विधाने योग्य आहे.
4) फक्त (ब) विधाने योग्य आहे.

9 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) भारताची माजी दुहेरीतील जागतिक क्रमांक एक चॉम्पियन 'सानिया मिर्झा' फेब्रुवारी 2023 मध्ये दुबईत व्यावसायिक टेनिस खेळातून निवृत्त होणार आहे.

(ब) 'सानिया मिर्झा' हीने आपल्या व्यावसायिक कारकीर्दमध्ये दहा ग्रॅंड स्लॅम दुहेरी विजेते पदे जिंकली आहेत.

(क) सन 2005 साली हैद्राबाद येथील टेनिस स्पर्धेत एकेरी विजेते पद जिंकणारी पहिली भारतीय महिला टेनिस पटू ठरली आहे.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त (अ) आणि (ब) विधाने योग्य आहेत.
2) फक्त (ब) विधान योग्य आहे.
3) फक्त (अ) आणि (क) विधाने योग्य आहेत.
4) फक्त (अ) विधान योग्य आहे.

10 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) 'महीला सन्मान बचत प्रमाणपत्र ही योजना सन – 2027 पर्यत चालू राहणार आहे.

(ब) 'महीला सन्यान बचत प्रमाणपत्र' योजने अंतर्गत ठेवीवर 5.2% व्याज दर निश्चित केला आहे.

(क) महीला सन्मान बचत प्रमाणपत्र' ही योजना फक्त विवाहीत महिलांसाठीच आहे.

(ड) 'महिला सन्मान बचत प्रमाणपत्र' ही योजना दोन वर्षाच्या कालावधीसाठी 2 लाख रूपयांपर्यत ठेव सुविधा प्रदान करते.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त (अ), (ब) आणि (क) विधाने योग्य आहेत.
2) फक्त (ड) विधान योग्य आहे.
3) फक्त (ब), (क) आणि (ड) विधाने योग्य आहेत.
4) फक्त (अ) विधान योग्य आहे.

11 **22 ऑगस्ट 2022 रोजी – या देशात 'राष्ट्रपिता महात्मा गांधीजी' यांचा पुतळा बसविण्यात आला होता, त्या पुतळयाचे अनावरण भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्या हस्ते झाले होते.**

1) पॅराग्वे 2) तुर्कस्थान 3) अफगाणिस्तान 4) द. आफ्रीका

12 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान / ने ओळखा**

(अ) 'जयंतकुमार बांठिया आयोग' हा राज्यशासनाने 11 मार्च 2022 रोजी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये ओबीसीना आरक्षण देण्यासंदर्भात स्थापन केला होता.

(ब) जयंत कुमार बांठिया आयोगाने आपला अहवाल 7 जुलै 2022 रोजी राज्यशासनास सादर केला होता.

(क) सन्माननीय सर्वोच्य न्यायालयाने 20 जुलै 2022 रोजी 27 टक्के ओबीसी आरक्षणासह महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या निवडणुका घेण्यास मान्यता दिला आहे.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त (अ) आणि (ब) योग्य आहे. 2) वरील सर्व विधाने योग्य आहेत

3) फक्त (ब) आणि (क) विधाने योग्य आहे. 4) फक्त (अ) विधान योग्य आहे.

13 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) नवी दिल्लीतील राजपथ मार्गाचे नाव 7 सप्टेंबर 2022 मध्ये कर्तव्यपथ असे करण्यात आले आहे.

(ब) इंडिया गेट वरील नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा पुतळा ते 'राष्ट्रपती भवन' हा रस्ता 'कर्तव्यपथ' म्हणून ओळखला जातो.

(क) ब्रिटिश काळात 'राजपथ' मार्गालाच 'डलहौसी' असे नाव होते.

(ड) नव्या 'कर्तव्यपथ' मार्गाचे एकूण अंतर 5.8 कि.मी. चे आहे.

**पर्यायी उत्तरे**

1) फक्त (अ), (ब) आणि (क) विधाने योग्य आहेत 2) फक्त (ब) आणि (ड) विधाने योग्य आहेत

3) फक्त (ड) विधान योग्य आहे. 4) फक्त (अ) आणि (ब) विधाने योग्य आहेत.

14 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) हरित उद्योग व आर्थिक संक्रमणासाठी सन 2070 पर्यंत 'पंचामृत' कडे भारताची वाटचाल सुरू झाली आहे.

(ब) सन 2023 – 2024 या आर्थिक वर्षात अंर्थ संकल्पात 'राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशन अंतर्गत 2035 पर्यंत 50 लाख मेट्रिक टन हरित हायड्रोजन निर्मितीचे लक्ष ठेवण्यात आले आहे.

(क) राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशनसाठी अर्थसंकल्पात 19700 कोटी निधी 2023 – 2024 च्या केंद्रिय अर्थसंकल्पात प्रस्तावित केला आहे.

**पर्यायी उत्तरेः**

1) फक्त विधाने (अ) आणि (ब) योग्य आहेत. 2) फक्त (ब) विधान योग्य आहे.

3) फक्त विधाने (अ) आणि (क) योग्य आहेत. 4) फक्त (क) विधान योग्य आहे.

15 **खालील विधानांचा विचार करून योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्यसेवा मुख्य परीक्षेतील बदलासाठी माजी सनदी अधिकारी 'चंद्रकांत दळवी' यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती.

(ब) चंद्रकांत दळवी समितीने राज्यसेवा मुख्य परीक्षा 'वर्णनात्मक' पद्धतीने घ्यावी अशी शिफारस केली होती.

(क) 'महाराष्ट्र लोकसेवा आयोग' राज्यसेवा मुख्य परीक्षांचा अभ्यासक्रम वर्णनात्मक पद्धतीने 2025 पासून अमंलात आणणार आहे.

**पर्यायी उत्तरे**

1) वरील सर्व विधाने योग्य आहेत. 2) फक्त (अ) आणि (ब) विधाने योग्य आहेत

3) फक्त (अ) आणि (क) विधाने योग्य आहेत 4) फक्त (ब) आणि (क) विधाने योग्य आहेत

16 **इंदूप्रकाश वृत्तपत्राबाबत अयोग्य विधान ओळखा.**

(अ) हे वृत्तपत्र फक्त इंग्रजी भाषेत होते.

(ब) विष्णू परशुराम पंडित यांनी 1862 साली सुरु केले.

(क) हे पत्र सत्यशोधक समाजाचे व्यासपीठ होते.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त (अ) 2) फक्त (क) 3) अ व क 4) वरीलपैकी नाही.

17 **1940 मध्ये नेमलेल्या "क्लाइड आयोग" कशाशी संबंधित होता ?**

1) तेभाग आंदोलन 2) जमीन सुधारणा संबंध 3) 1919 कायद्याची चौकशी 4) जकात व वेतन संदर्भात

18 **योग्य जोड्या लावा.**

| | | | |
|---|---|---|---|
| i) | भारत स्त्री मंडळ | (अ) | गोपाळ कृष्ण गोखले |
| ii) | सेवा समिती | (ब) | महर्षी कर्वे |
| iii) | भारत सेवक समाज | (क) | सरला देवी |
| iv) | निष्काम कर्ममठ | (ड) | पं.हृदयनाथ कंझरु |

**पर्यायी उत्तरे :**

| | i | ii | iii | iv |
|---|---|---|---|---|
| 1) | ड | क | ब | अ |
| 2) | क | ड | अ | ब |
| 3) | अ | ब | क | ड |
| 4) | ड | ब | अ | क |

19 **पुण्यात बालविवाहावर बंदी व स्त्री शिक्षणास प्रोत्साहन देणारी संस्था पुढीलपैकी कोणी सुरु केली होती ?**

1) सरोजिनी नायडू 2) पंडिता रमाबाई 3) कमला नेहरु 4) ॲनी बेझंट

20 **खालीलपैकी मुंबई इलाख्याचे गव्हर्नर कोण होते ?**

(अ) एलफिस्टन,सर जॉन माल्कम (ब) थॉमस मन्रो,चॅटलीन रॉबर्टसन

(क) ग्रॅट, पॉन्टीन्जर (ड) डफ, मार्शमेन

**पर्यायी उत्तरे :**

1) (अ) आणि (क) फक्त 2) (ब) (क) आणि (ड) फक्त 3) (ब) आणि (क) फक्त 4) (अ) (ब) आणि (क) फक्त

21 **महाराष्ट्रातील नाटका विषयी जोड्या लावा.**

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | रत्नाकर मतकरी | i) | महानिर्वाण |
| (ब) | जयवंत दळवी | ii) | एक अंडे फुटले |
| (क) | सतिष आळेकर | iii) | सुर्यास्त |
| (ड) | दिलीप जगताप | iv) | घर तिघांच हव |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | iv | iii | i | ii |
| 2) | ii | iv | i | ii |
| 3) | iii | ii | iv | i |
| 4) | iv | i | ii | iii |

22 **1866 मध्ये उत्तरप्रदेशातील -------- जिल्ह्यात देवबंद स्कुलची स्थापना करण्यात आली.**

1) लखनौ 2) मोरादाबाद 3) सहारनपूर 4) अलिगढ

23 **------------- यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे स्थापन झालेल्या महाराष्ट्र सविनय कायदेभंगाच्या समितीला विले-पार्ले हुन सविनय कायदेभंगाच्या कार्यक्रमाला पाठिंबा मिळाला.**

1) वा.वि. दास्ताने 2) शंकरराव देव 3) किशोरलाल मधुवाला 4) अनंत वासूदेव सहस्त्रबुध्दे

24 **राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनात कोणते ठराव संमत करण्यात आले ?**

(अ) ब्रम्हदेश खालसा करण्यात यावा. (ब) सनदी सेवा परिक्षेसाठी वयोमर्यादा 24 वर्ष असावी.

(क) इंडिया कौन्सिल (भारत मंडळ) रद्द करावे. (ड) लष्करी खर्च वाढविण्यात येवू नये.

पर्यायी उत्तरे :

1) अ आणि ब 2) अ, ब, आणि ड 3) अ आणि क 4) क आणि ड

25 **दिनकरराव जवळकरांचा खालीलपैकी कशाशी संबंध नव्हते ?**

1) महाड सत्याग्रह 2) सविनय कायदेभंग चळवळ 3) काळाराम मंदिर सत्यागृह 4) असहकार चळवळ



स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

26 **1857 चा कोल्हापुरातील उठाव खालीलपैकी कोणत्या अधिकाऱ्याने दडपुन टाकला होता ?**

(अ) जेकब (ब) ग्लासपुल (क) मेजर डॅनियल (ड) रॉबर्टसन

पर्यायी उत्तरे :

1) (अ) फक्त 2) अ आणि ब 3) क फक्त 4) ब, क आणि ड

27 **'भरली घागर' नावाचा कथासंग्रह कोणी लिहला होता ?**

1) काशिबाई कानिटकर 2) लक्ष्मीबाई टिळक 3) रखमाबाई राऊत 4) जानका शिंदे

28 **'बॉम्बे असोसिएशन' बाबत अयोग्य विधान ओळखा.**

1) महाराष्ट्रातील ही पहिली राजकीय संघटना होती. 2) भाऊ दाजी लाड हे या संघटनेचे चिटणीस होते.
3) ही संघटना खाजगी व गुप्त होती. 4) बोम्मनजी होरमसजी हे या संघटनेचे अध्यक्ष होते.

29 **ब्रिटिश काळात दुष्काळासाठी 'मॅकडोनाल्ड आयोग' कोणत्या गव्हर्नर जनरलच्या काळात नेमला होता.**

1) लॉर्ड मिंटो 2) लॉर्ड कर्झन 3) लॉर्ड एल्गिन 4) लॉर्ड डलहौसी

30 **'अनार्थ दोष परिहार समाज' गोपाळ बाबा वलंगकरांनी ------- येथे स्थापना केला.**

1) अकोला 2) सावंतवाडी 3) दापोली 4) नगर

31 **पृथ्वीच्या अंतरंगातील तापमान पृष्ठभागापासून खोल जावे तसे -------**

1) वाढत्या प्रमाणात कमी होते 2) वाढत्या प्रमाणात वाढते 3) सारख्या प्रमाणात वाढते 4) घटत्या प्रमाणात वाढते

32 **'हिमालयास दक्षिणेकडे वक्राकार प्राप्त झाला आहे' कारण**

1) भारतीय द्विपकल्प उत्तरेकडे सरकत असताना दोन्ही बाजूने (पश्चिम व पूर्व ) ते जास्तीत जास्त उत्तरेकडे ढकलले गेले आहे.
2) भारतीय द्विपकल्प उत्तरेकडे सरकत असताना मध्यभागी ते जास्तीत जास्त उत्तरेकडे ढकलले गेले आहे.
3) युरेशिया दक्षिणेकडे सरकत असताना हिमालयाच्या दोन्ही (पश्चिम/पूर्वे ) भाग जास्तीत जास्त दक्षिणेकडे ढकलले गेले
4) टेथिस समुद्राच्या वक्राकार दक्षिणेकडे होता.

33 **हवामानाच्या कोणत्या घटकामुळे हवेचा दाब बदलतो ?**

1) पाऊस 2) वारा 3) आर्द्रता 4) सर्वात महत्वाचा घटक वर नमुद नाही.

34 **मृदा तयार होण्याच्या प्रक्रियेत खालीलपैकी कोणते क्रियाशील घटक आहेत ?**

1) हवामान आणि प्रदेशाची स्वाभाविक रचना 2) वनस्पती आणि प्रदेशाची स्वाभाविक रचना
3) वनस्पती आणि भौतिक उगम 4) हवामान आणि वनस्पती

35 **योग्य जोड्या लावा.**

| | **नदी** | | **खाडी** |
|---|---|---|---|
| (i) | पातळगंगा | (अ) | दाभोळ |
| (ii) | कुंडलिका | (ब) | बाणकोट |
| (iii) | सावित्री | (क) | राजापुर |
| (iv) | वशिष्ठी | (ड) | धरमतर |

पर्यार उत्तरे :

| | **i** | **ii** | **iii** | **iv** |
|---|---|---|---|---|
| 1) | क | अ | ब | ड |
| 2) | अ | ब | क | ड |
| 3) | ड | क | ब | अ |
| 4) | ड | अ | ब | क |

36 **महाराष्ट्रातील ऊर्जेचा वापर केल्या जाणाऱ्या क्षेत्राचा उतरता क्रम लावा.**

(अ) औद्योगिक (ब) कृषी (क) रेल्वे (ड) घरगुती

पर्याय उत्तरे :

1) औद्योगिक, कृषी, घरगुती, रेल्वे 2) औद्योगिक, घरगुती, कृषी, रेल्वे
3) कृषी, औद्योगिक, रेल्वे, घरगुती 4) रेल्वे, औद्योगिक, कृषी, घरगुती.

37 **दख्खन पठारावरील भू- गर्भीय हालचालींचे ------ हे पुरावे आहेत.**

1) नदी खोरी 2) लाव्हाचे थर 3) गरम पाण्याचे झरे 4) कळसूबाई

38 **महाराष्ट्रातील उष्ण कटिबंधीय सदाहरित पर्वतीय जंगलाची उंची व घनता खुपच मर्यादित आहे कारण _**
(अ) जमिनीचा तीव्र उतार व जांभी मृदा. (ब) दिर्घकाळ असणारा कोरडा ऋतू (क) समुद्र सपाटीपासून असणारे उच्च स्थान
**पर्यायी उत्तरे :**
1) अ फक्त 2) अ आणि ब 3) ब आणि क 4) अ,ब, आणि क

39 **संथाल व गोंड यांच्या नंतर भिल्ल हा वन्य जमातीतील तिसरा मोठा लोकसमूह आहे. देशात भिल्लाचे एकत्रीकरण कोणत्या चार राज्यात झाले आहे ?**
1) राजस्थान, पंजाब, मध्यप्रदेश, महाराष्ट्र 2) महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, राजस्थान, गुजरात
3) गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र, मध्यप्रदेश 4) मध्यप्रदेश, गुजरात, राजस्थान, झारखंड

40 **वातावरणातील बाष्पाचे प्रमाण ---------- कडून कमी कमी होते.**
(अ) विषुववृत्ताकडुन ध्रुवाकडे (ब) ध्रुवाकडुन विषुववृत्ताकडे
(क) कर्कवृत्ताकडुन विषुववृत्ताकडे (ड) मकरवृत्ताकडुन विषुववृत्ताकडे
पर्यायी उत्तरे :
1) फक्त अ 2) फक्त ब 3) फक्त क आणि ड 4) फक्त अ आणि ब

41 **आशिया खंडातील एकमेव भुमिगत वीजगृह महाराष्ट्रात कोठे आहे ?**
1) भाटघर 2) कोयना 3) येलदरी 4) जायकवाडी

42 **ऊसापासून साखर करताना ऊसाच्या एकुण वजनाच्या किती टक्के रुपांतर होऊ शकते ?**
1) 40% 2) 30% 3) 20% 4) 10%

43 **सुवर्ण क्रांतीचा संबंध आहे ?**
1) अन्न उत्पादन 2) दुग्ध उत्पादन 3) मधुमक्षिका उत्पादन 4) फलोत्पादन

44 **खालीलपैकी कोणते घटक खेडयांचा आकार ठरवितात ?**
(अ) प्रत्येक लोकसंख्येचा आकार (ब) लोकांना आधार देण्याची भूमीक्षता
(क) प्रदेशातील आर्थिक विकासाचा स्तर (ड) जमिनीची प्राकृतिक मर्यादा
पर्यायी उत्तरे :
1) अ, आणि ब 2) अ आणि ड 3) अ,ब आणि क 4) अ,ब आणि ड

45 **खालील घटकापैकी कोणते घटक अमरावती,अकोला,यवतमाळ जिल्ह्यात लोकसंख्येची कमी घनता असल्यास कारणीभूत झालेला नाही ?**
(अ) शेती उत्पादनाची अनिश्चितता (ब) भटक्या जमातीचे अस्तित्व (क) अत्यंत दाट वने
पर्याय उत्तरे :
1) अ व ब 2) अ व क 3) फक्त क 4) फक्त ब

46 **'अल्फा कण' _ _ _ _ ह्यानी शोधून काढले ?**
1) जे.जे. थॉमसन 2) अे.आईन्स्टाईन 3) ई- रुदरफोर्ड 4) मादाम क्युरी

47 **रेडिओ तरंगाचा वेग हा ---------- असतो.**
1) प्रकाशाच्या वेगापेक्षा जास्त 2) प्रकाशाच्या वेगा एवढा 3) प्रकाशाच्या वेगापेक्षा कमी 4) प्रकाशाच्या वेगाच्या दुप्पट

48 **पाण्यात क्लोरीन नेहमी मिसळतात कारण**
1) ऑक्सिजन चे प्रमाण वाढते 2) जंतूना मारते 3) गाळ काढण्यासाठी 4) न विरघळणारी अशूध्दता घालवण्याठी

49 **खालीलपैकी कार्बनचे अॅलोट्रॉप कुठले ते सांगा?**
(अ) कार्बन हलाईड्स (ब) डायमंड (क) फुलरीन्स (ड) ग्राफाईट (इ) कॅऑइट
**पर्यायी उत्तरे :**
1) सर्व पर्याय योग्य 2) ब,क,ड 3) अ,ब,क 4) अ,ब,ड

50 **अभ्रक कपड्याच्या इस्त्रीत वापरला जातो, यासंदर्भात पुढील दोन विधानांपैकी कोणते योग्य आहे?**
(अ) अभ्रक उष्णतेचा सुवाहक आहे. (ब) अभ्रक वीजेचा सुवाहक आहे.
**पर्यायी उत्तरे :**
1) फक्त अ 2) फक्त ब 3) दोन्ही अ व ब 4) दोन्ही नाहीत

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

51 **वर्गीकरण तत्वानुसार कोणते वर्गीकरण योग्य आहे.**
1) सी - फैन, सी-स्टार, सी - पेन 2) जेली-फिश,सिल्वर फिश, स्टार फिश
3) फोलास, पायला,कटलफिश 4) अर्थवर्म,अकॉर्नवर्म,कलॅम वर्म

52 **DNA मध्ये थायमीन नेहमी कुठल्या अमायनो ॲसिडशी जोडी बनवतो?**
1) ॲडेनायीन 2) सायटोसीन 3) ग्वानीन 4) थायमीन

53 **एका मिनिटात मुत्रपिंडातून किती रक्त वाहते ?**
1) 1 लिटर 2) 0.75 लिटर 3) 0.50 लिटर 4) 0.25 लिटर

54 **काही झाडामध्ये तांब्यांच्या कमतरतेमुळे सालीवर फोड व खोलवर तुकडे पडुन त्यातून डिंक बाहेर येतो अशा रोगाला ----- म्हणतात**
1) एक्झाथिंम 2) पांढराडोळा 3) डायबॅक 4) पेशीमृत होणे

55 **सरड्यासारखे दिसणारे उभयचर सॅलॅमॅण्डर------ गणात मोडतात**
1) जीम्नोफिओना 2) युरोडेला 3) ॲन्युरा 4) अपोडा

56 **वनस्पती शेंगाधारी कुळातील मुळांच्या गाठीमध्ये रंगद्रव्य असतात, ज्यामुळे नत्राचे स्थिरीकरण होते,त्या रंगद्रव्यास काय म्हणावे ?**
1) ॲन्थोसायनीन 2) क्लोरोफिल 3) लेहहिमोग्लोबीन 4) हिमोग्लोबीन

57 **नेचे हे ----------- या गटात येतात.**
1) ब्रायोफायटा 2) जीम्नोस्पर्मस 3) टेरिडोफयटा 4) ॲंजिओस्पर्मस

58 **सामान्यत : लाल रक्तपेशीचा आकार कसा असतो ?**
1) कोयता किंवा विळीप्रमाणे (क्षत्राकार) 2) व्दिबहिर्वक्र (बाय कॉनव्हेस्कस)
3) बायकॉनेकव्ह 4) वरील कोणतेही नाही

59 **पिवळा ताप हा रोग कशामुळे होतो?**
1) आरबी व्हायरस / विषाणू 2) राब्डो व्हायरस / विषाणू
3) रिकेट्सीआ 4) ह्युमन इमुनो डेफीसींएसी व्हायरस

60 **राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमाबाबत (NACP) खालीलपैकी कोणते विधान / विधाने बरोबर आहेत ?**
(अ) या कार्यक्रमातील खर्च केंद्र आणि राज्य यांच्याकडुन 80 : 20 सुत्रानुसार केला जातो.
(ब) कार्यक्रमाचा हेतू एड्सची नवीन लागण रोखणे असा आहे.
पर्यायी उत्तरे :
1) फक्त अ 2) दोन्ही अ व ब 3) फक्त ब 4) दोन्ही नाहीत.

61 **प्रारंभिक 200 संख्याचे (1, 2, 3 ते 200) एकदा लेखन करण्यासाठी संगणकावरील संख्याची बटने किती वेळा दाबावी लागतील ?**
1) 491 2) 492 3) 493 4) 494

62 **एक घड्याळ प्रत्येक तासाला 5 सेकंद पुढे जाते जर ते घडयाळ सोमवारी सकाळी 9.00 वाजता बरोबर लावले तर ते घडयाळ त्यांनतर लगेच येणाऱ्या शनिवारी सकाळी 9 वाजता कोणती वेळ दाखवेल ?**
1) 9 वाजून 10 मिनिटे 2) 10 वाजून 12 मिनटे 3) 8 वाजून 8 मिनिटे 4) 9 वाजून 7 मिनटे

63 **दोन 500 मी. लांबीच्या मालगाड्या विरुध्द दिशेने समांतर रुळावरुन धावत आहे. त्यांचा वेग अनुक्रमे 45Km/ताशी आणि 30 Km/ताशी आहे. वेगवान गाडीच्या चालकाला ओलडण्यास मंदगती गाडी किती वेळ घेईल ?**
1) 48 सेकंद 2) 14 सेकंद 3) 60 सेकंद 4) 24 सेकंद

64 **पाच अक्षरसमूह दिलेल आहेत त्यापैकी एक, विशिष्ट प्रकारे इतरांहून वेगळा आहे तो वेगळा अक्षरसमुह शोधा ?**
(अ) LSNVE (ब) BOQUR (क) QBEFK (ड) HNLIV (इ) FWGHZ
पर्यायी उत्तरे :
1) ब 2) क 3) ड 4) इ

65 **प्रश्नार्थक चिन्हाने दर्शवलेले एक पद गाळलेली संख्या मालिका दिली आहे. हे गाळलेले पद दिलेल्या पर्यायापैकी एक आहे ते शोधा ?**
1, 8, 9, ? , 25, 216, 49
1) 64 2) 16 3) 27 4) 125

66 **जर $a \geq 0$, $b > 0$ आणि $c > 0$ तर ?**

$a + \frac{1}{b+\frac{1}{6}}$ = ________

1) $\frac{a+b}{b+c+1}$ 2) $\frac{abc+a+c}{bc+1}$ 3) $\frac{abc+bc+1}{b+c+1}$ 4) $\frac{abc+b+c}{bc+1}$

67 **जर एका बादलीत 3/5 भाग पाणी भरते तर त्या बादलीचे वजन 15 कि.ग्रॅ. भरते आणि जर त्या बादलीत 4/5 भाग पाणी भरले तर तिचे वजन 19 कि.ग्रॅ. भरते तर पाण्याने पुर्ण भरलेल्या बादलीचे वजन काढा ?**

1) 20 कि.ग्रॅ. 2) 25 कि.ग्रॅ. 3) 25 कि. ग्रॅ. 4) 23 कि. ग्रॅ.


68 **एका रांगेत मनोज शेवटून दुसरा आहे. रमेश त्यांच्या पुढे तीन विद्यार्थ्यानंतर उभा आहे. सुरेश हा रमेशच्या अगोदर सातव्या स्थानावर उभा आहे. रांगेमध्ये सुरेशचे स्थान नववे आहे, तर त्या रांगेत एकूण किती विद्यार्थी आहेत ?**

1) 18 2) 19 3) 20 4) 21

69 **16 रंगीत व 56 रंग न दिलेले घन मिळून एक मोठा घन अशाप्रकारे बनवला की कमीत कमी पृष्ठभाग रंगलेला असेल तर एकुण पृष्ठभागाच्या किती % भाग रंगीत असेल ?**

1) 26% 2) 44% 3) 35% 4) सांगता येणार नाही

70 **प्रश्नचिन्हांच्या जागी येणारी संखा ओळखा.**




1) 45 2) 30 3) 60 4) 75

71 **विधान - तुम्ही एका जिल्ह्यामध्ये प्रशासकिय अधिकारी आहात. जिल्ह्याचा काही भाग हा किनाऱ्याला लागुन आहे मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली असून त्या भागातील नद्यावरील धरणे आधीपासून ओसांडुन वाहत आहेत.**

कृतिक्रम-

(अ) किनाऱ्यावरील लोकांसाठी निवारागृह उभाराल जेणेकरुन कमी वेळात त्यांना स्थलांतरित करता येईल.

(ब) देखरेख करणाऱ्या सर्व संस्थाकडुन सुचना शक्य तेवढ्या लवकर प्रसारीत होतील याची खात्री कराल.

(क) हवामान खात्याचा सल्ला घ्याल.

(ड) शेजारील जिल्ह्यातून मदत मागवाल

पर्यायी उत्तरे :

1) फक्त अ 2) अ आणि ब 3) क आणि ड 4) फक्त क

72 **अ, ब आणि क ह्यांनी 4: 3: 2 प्रमाणात गुंतवणूक करुन एक उद्योग सुरु केला. वर्षाच्या शेवटी 5 : 3 : 4 प्रमाणात नफा वाटून घेतला. त्यांच्या मुदतीचे गुणोत्तर काय ?**

1) 20: 9: 9 2) 4: 5: 8 3) 5: 4: 8 4) 8: 10: 5

73 **A,B,C,D,E आणि F हे सहा विद्यार्थी आहेत. प्रत्येकाने सहापैकी एका विषयात पहिला क्रमांक मिळाला आहे. गणित, इंग्रजी, हिंदी, इतिहास, भूगोल आणि विज्ञान असे सहा विषय आहेत. आणि प्रत्येकाचा सगळे गुण मिळून वेगवेगळा क्रमांक आहे.**

i) ज्यांचा विज्ञानामध्ये पहिला क्रमांक आहे त्यांचा सगळे गुण मिळून पहिला क्रमांक आहे.

ii) D चा E पेक्षा चांगला क्रमांक आहे पण A पेक्षा कमी गुण मिळाले आहेत. त्याने इतिहासात पहिला क्रमांक मिळवला आहे.

iii) सगळ्यात कमी गुण मिळणाऱ्याने गणितात पहिला क्रमांक मिळवला आहे.

iv) A आणि E पेक्षा दोघांनी ना विज्ञान ना भूगोल मध्ये पहिला क्रमांक मिळवला आहे.

v) F ने भूगोल मध्ये पहिला क्रमांक मिळविला आहे.

vi) F ला E पेक्षा ज्याने हिंदीमध्ये पहिला क्रमांक मिळविला आहे त्याच्यापेक्षा कमी गुण आहेत तर C पेक्षा अधिक गुण आहेत. कोणी विज्ञानामध्ये पहिला क्रमांक पटकविला आहे?

1) A 2) B 3) C 4) D

74 **M हे B चे वडील आहे. N ही C ची मुलगी आहे. C ही M ची मुलगी आहे. तर B चे N शी नाते काय?**

1) काका किंवा आत्या 2) मामा किंवा मावशी 3) पुतण्या किंवा पुतणी 4) भाचा किंवा भाची

75 **सुरज गौरवला सांगतो,"मी कॉफी पिणे कमी करणार आहे. लोकांनी मला सांगितले की,कॅफिन हे स्वास्थासाठी चांगले नाही" गृहीतके :**

(अ) कॉफीमध्ये कॉफिन आढळते.
(ब) लोकांचे कॉफिविषयाचे मत त्यांच्या नजरेत बरोबर आहे.
(क) गौरवसुद्धा कॉफी पिणे कमी करु शकतो.

पर्यायी उत्तरे :

1) अ आणि ब अंतर्निहीत आहे
2) सर्व अंतर्निहीत आहेत
3) फक्त अ अंतर्निहीत आहे.
4) फक्त ब अंतर्निहीत आहे

76 **खालील कोणते घटक भारतातील आर्थिक नियोजनाचे अपयश आहेत ?**

(अ) अल्प दरडोई उत्पन्न आणि वृद्धीदर
(ब) दारिद्रय आणि बेकारी
(क) संथ उद्योगीकरण
(ड) उत्पन्न आणि संपत्तीतील विषमता

पर्यायी उत्तरे :

1) ब, ड आणि क
2) अ, ब आणि क
3) अ आणि ब
4) ब आणि ड

77 **भारताच्या दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये खालील लक्ष्य निश्चित केले नव्हते.**

1) दारिद्रयात घट
2) सहकारास प्रोत्साहन
3) वृद्धी दर व रोजगारात वाढ
4) प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण

78 **1991 च्या लघूउद्योगासाठीच्या योजनेनुसार राष्ट्रीय लघुउद्योग महामंडळाने खालीलपैकी कोणत्या गोष्टीवर लक्ष द्यायचे होते.**

1) वित्त उभारणी
2) निर्यातीस प्रोत्साहन
3) विपणनास सहाय्य
4) कुशल कामगारांची तरतुद

79 **खालील विधानांचा विचार करुन योग्य विधान / ने ओळखा.**

(अ) वित्तीय समावेशन या बाबीत 'थेट लाभ हस्तांतरण योजनेचा समावेश होतो.
(ब) 'थेट लाभ हस्तांतरण योजना' 12 डिसेंबर, 2014 पासून संपूर्ण भारत देशात लागू करण्यात आली.

**पर्यायी उत्तरे :**

1) केवळ विधान (अ) योग्य आहे.
2) केवळ विधान (ब) योग्य आहे.
3) विधाने (अ) आणि (ब) दोन्ही अयोग्य आहेत.
4) (अ) आणि (ब) दोन्ही विधाने योग्य आहेत.

80 **भारतातील कृषी क्षेत्रातील बेरोजगारी ही मुख्यत: कशा प्रकारची आहे.**

(अ) हंगामी
(ब) प्रच्छन्न
(क) जुनाट
(ड) अस्थायी

**पर्यायी उत्तरे :**

1) अ आणि ब
2) ब आणि क
3) अ,ब,क
4) ब आणि ड

81 **खालीलपैकी कशास नॅरोमनी ही संज्ञा देता येईल ?**

1) लोकांजवळील रोख रक्कम + मागणी ठेवी
2) लोकांजवळील रोख रक्कम + दागदागिने व अन्य जंगम मालमत्ता
3) लोकांच्या मागणी ठेवी + दिर्घ मुदतीच्या ठेवी
4) लोकांकडील विविध मुदतीच्या ठेवी + रोखे

82 **2011 च्या जनगणनेनुसार केरळ राज्यात दर हजार पुरुषामागे स्त्रियांची संख्या किती होती ?**

1) 1032
2) 1040
3) 1058
4) 1084

83 **एका कुटूंबात दोन मुले असावीत असे कोणत्या राष्ट्रीय लोकसंख्या धोरण मध्ये जाहिर झाले होते ?**

1) 1976
2)1991
3) 2000
4) 2001

84 **योग्य विधाने निवडा ?**

(अ) लक्षित सार्वजनिक वितरण व्यवस्था 1997 मध्ये सुरु करण्यात आली.
(ब) लक्षित सार्वजनिक वितरण व्यवथा ही सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात आहे.

**पर्यायी उत्तरे :**

1) फक्त अ बरोबर
2) फक्त ब बरोबर
3) अ ,ब दोन्ही बरोबर
4) अ, ब दोन्ही चुक

85 **दारिद्रय तफावत गुणोत्तर हे शिर गणती गुणोत्तरापेक्षा निरपेक्ष दारिद्रय मापनाचे जास्त चांगले मापक आहे कारण_**

1) कौटुंबिक उत्पनाचा तपशील उपलब्ध नसतो.
2) किमान स्वास्थाच्या प्रमाणाची व्याख्या करणे कठीण आहे.
3) ते निरपेक्ष दारिद्रय दुर करण्यासाठी किती उत्पन्न तुट भरुन काढावी लागेल हे दर्शवते.
4) वरीलपैकी कुठलेच नाही.

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

86 **एल. पी. जी. चा अन्वयार्थ काय आहे?**
1) लिक्विडिटी, प्रॉफिर्टेबिलीटी अॅण्ड ग्रोथ
2) लिबरलायझेशन, प्रायव्हटायझेशन अॅण्ड ग्रोथ
3) लिबरलायझेशन प्रायव्हटायझेशन अॅण्ड ग्लोबलायझेशन
4) वरीलपैकी एकही नाही.

87 **भारताच्या सार्वजनिक कर्जात ________ चा समावेश होतो.**
(अ) बाह्य (परकिय) कर्ज
(ब) अंतर्गत कर्ज
(क) सार्वजनिक मर्यादित कंपन्यांचे कर्ज
(ड) स्थानिक संस्थाचे कर्ज
**पर्यायी उत्तरे :**
1) अ, ब आणि ड 2) ब, क आणि ड 3) फक्त ब 4) अ आणि ब

88 **खालीलपैकी कोणते विधान अयोग्य आहे?**
(अ) अंतर्गत कर्जामळे विषमतेत वाढ होत नाही
(ब) परिणामकारक कर्ज व्यवस्थापनाकरीता शासकिय रोख्यासाठी कार्यक्षम बाजारपेठेची आवश्यकता नसते
(क) सार्वजनिक कर्ज हा शासनाच्या महसुलाच महत्वाचा स्त्रोत नाही.
**पर्यायी उत्तरे :**
1) फक्त अ 2) अ,ब,क 3) फक्त ब,क 4) फक्त ब

89 **अंदाजपत्रकीय तुट एकुण प्राप्तीवजा ___?**
1) भांडवली खर्च 2) एकुण खर्च 3) महसूल खर्च 4) सरकारचे कर्ज आणि दायित्व

90 **खालीलपैकी कोणता कर प्रत्यक्ष कर नाही ?**
1) देणगी कर 2) विक्री कर 3) संपत्ती कर 4) उत्पन्न कर

91 विधान - न्यायालयाच्या आदेशांचे हेतूपूर्वक उल्लंघन किंवा त्यांचे पालन न करणे व न्यायालयांच्या व्यवहाराबद्दल अपशब्द वापरणे हा न्यायालयाचा अवमान आहे
कारण - अवमानकारक वागणुकीसाठी शिक्षा करण्याचे अधिकार दिल्याशिवाय न्यायालयीन कृतीशीलता प्रत्यक्षात आणता येणार नाही.
**खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा.**
1) विधान व कारण दोन्ही बरोबर आहे व कारण हे विधानाचे स्पष्टीकरण देते.
2) विधान व कारण दोन्ही बरोबर आहे. पण कारण हे विधानाचे स्पष्टीकरण देत नाही.
3) विधान बरोबर आहे पण कारण चुक आहे.
4) विधान चुक आहे पण कारण बरोबर आहे.

92 **पक्षांतर विरोधी कायदा 1979 मध्ये खालीलपैकी एक राज्यात पारित करण्यात आला होता ते राज्य कोणते ?**
1) केरळ 2) जम्मू आणि कश्मिर 3) पश्चिम बंगाल 4) तामिळनाडू

93 **शेती उत्पन्नावरील कर राज्य सरकारच्या अखात्यामध्ये खालीलपैकी कुणी सोपवलेले आहेत ?**
1) आंतरराज्य परिषद 2) राष्ट्रीय विकास परिषद 3) भारतीय राज्यघटना 4) नियोजन आयोग

94 **महाराष्ट्रात नागरी स्थानिक संस्थेमध्ये कार्ये करणाऱ्या N.G.O.(गैर सरकारी संघटना) कोणत्या आहेत ?**
(अ) अपनालय (ब) मशाल (क) युवा (ड) लोकसत्ता
पर्यायी उत्तरे :
1) फक्त अ,ब,क 2) फक्त अ,ब,ड 3) फक्त अ,क,ड 4) फक्त ब,क,ड

95 **घटक राज्याची पुर्नरचना किंवा त्यांच्या सीमा बदलण्या बाबतच्या खालील विधानापैकी कोणते विधाने चूक आहे ?**
1) संसदेला तो अधिकार दिला आहे
2) संसद साध्या बहुमताने तसा कायदा तयार करु शकते
3) विधेयकाची शिफारस करण्यापुर्वी राष्ट्रपतीने संबंधित घटकराज्य विधीमंडळाची मते अजमावली पाहिजेत
4) सीमा बदलण्यासाठी संबंधीत घटकराज्याची संमती आवश्यक आहे.

96 **महाराष्ट्रात लागलेल्या राष्ट्रपती राजवटीबाबत अयोग्य विधान / विधाने ओळखा.**
1) महाराष्टात पहिल्यांदा 1980 साली राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली होती
2) आतापर्यंत महाराष्टात तिन वेळा राष्ट्रपती राजवट लागू केली आहे.
3) 1980 साली लागू केलल्या राष्ट्रपती राजवटीत पुलोद सरकार बरखास्त केले होते.
4) महाराष्ट्रात तिसऱ्या वेळेला राष्ट्रपती राजवट 23 नोंव्हे 2019 रोजी लागू करण्यात आली होती

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 97 | **लोकसभा निवडणुका 2019 मध्ये सर्वाधिक उमेदवार असलेला तिसऱ्या क्रमांकाचा पक्ष कोणता?** | | | |
| | 1) तृणमुल काँग्रेस | 2) कम्युनिस्ट पार्टी | 3) बहूजन समाजवादी पार्टी | 4) राष्ट्रीय काँग्रेस |
| 98 | **125 वे घटनादुरुस्ती विधेयक कोणत्या अनुसूचीशी संबंधित आहे ?** | | | |
| | 1) पहिली अनुसूची | 2) दहावी अनुसूची | 3) आठवी अनुसूची | 4) सहावी अनुसूची |
| 99 | **राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग कोणत्या कलमानुसार स्थापन करण्यात येतो ?** | | | |
| | 1) कलम - 335 A | 2) कलम - 336 B | 3) कलम - 338 B | 4) कलम - 337 A |
| 100 | **विधानसभेचे कामकाज कोणत्या भाषेतून चालते ?** | | | |
| | 1) मराठीतून | 2) मराठी किंवा हिंदीतून | 3) मराठी किंवा इंग्रजीतून | 4) मराठी, हिंदी किंवा इंग्रजीतून |

# ALL THE BEST

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

## सूचना माहितीस्तव - (पृष्ठ 1 वरून पुढे ........)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यक्तिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे. असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम - 82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/ किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ सपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग - 1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

## नमुना प्रश्न (माहितीस्तव)

प्र. क्र. 101. **'गुलामगिरी' हे पुस्तक कोणी लिहले आहे ?**

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर 2) गो.ग. आगरकर

3) महात्मा फुले 4) राजा राममोहन रॉय

ह्या प्रश्नाचे उत्तर "(3) महात्मा फुले " असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 101. ① ② ● ④

अशा पध्दतीने प्रस्तुत प्रश्नपुसस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर - क्रमांक तुम्हाला स्वतंत्र्यरीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्यात त्या प्रश्नपक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळया शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

## कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK.

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

अधिकारी घडविणारी विश्वसनीय संस्था

# स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर

**UPSC/MPSC/BANKING/SSC**

**Director : Dr. Vilas S. Gajghate 9923262977**

2023

**Code : SPO4**

## संयुक्त पूर्व परीक्षा (गट ब व गट क)

सामान्य क्षमता चाचणी

वेळ : 1 (एक) तास

एकूण प्रश्न : 100

Paper No. 04

एकूण गुण : 100

### सराव पेपर क्र . 04

| Question No | Answer | Question No | Answer | Question No | Answer | Question No | Answer |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | 2 | **26** | 1 | **51** | 3 | **76** | 4 |
| **2** | 1 | **27** | 2 | **52** | 1 | **77** | 2 |
| **3** | 4 | **28** | 4 | **53** | 1 | **78** | 3 |
| **4** | 3 | **29** | 2 | **54** | 1 | **79** | 4 |
| **5** | 2 | **30** | 3 | **55** | 2 | **80** | 3 |
| **6** | 4 | **31** | 4 | **56** | 3 | **81** | 1 |
| **7** | 2 | **32** | 1 | **57** | 3 | **82** | 4 |
| **8** | 1 | **33** | 4 | **58** | 3 | **83** | 3 |
| **9** | 3 | **34** | 4 | **59** | 1 | **84** | 1 |
| **10** | 2 | **35** | 3 | **60** | 3 | **85** | 3 |
| **11** | 1 | **36** | 1 | **61** | 2 | **86** | 3 |
| **12** | 2 | **37** | 3 | **62** | 1 | **87** | 4 |
| **13** | 4 | **38** | 2 | **63** | 4 | **88** | 2 |
| **14** | 3 | **39** | 3 | **64** | 4 | **89** | 2 |
| **15** | 1 | **40** | 1 | **65** | 1 | **90** | 2 |
| **16** | 3 | **41** | 2 | **66** | 2 | **91** | 2 |
| **17** | 1 | **42** | 4 | **67** | 4 | **92** | 3 |
| **18** | 2 | **43** | 3 | **68** | 4 | **93** | 3 |
| **19** | 2 | **44** | 4 | **69** | 2 | **94** | 1 |
| **20** | 4 | **45** | 3 | **70** | 2 | **95** | 4 |
| **21** | 1 | **46** | 3 | **71** | 2 | **96** | 4 |
| **22** | 3 | **47** | 2 | **72** | 3 | **97** | 3 |
| **23** | 2 | **48** | 2 | **73** | 2 | **98** | 4 |
| **24** | 4 | **49** | 2 | **74** | 2 | **99** | 3 |
| **25** | 4 | **50** | 1 | **75** | 1 | **100** | 4 |

स्पंदन करिअर इन्स्टीट्युट, नागपूर